.. Dasabodh by Samartha Ramadas Swami Chapter 4 ..

॥ समर्थ रामदासांचा दासबोध दशक ४ ॥

॥ दशक चौथा : नवविधा भक्तिनाम ॥ ४॥

समास पहिला : श्रवणभक्ती

॥ श्रीराम ॥

जयजय जी गणनाथा । तूं विद्यावैभवें समर्था ।
अध्यात्मविद्येच्या परमार्था । मज बोलवावें ॥ १॥
नमूं शारदा वेदजननी । सकळ सिद्धि जयेचेनी ।
मानस प्रवर्तलें मननीं । स्फूर्तिरूपें ॥ २॥
आतां आठऊं सद्गुरु । जो पराचाहि परु ।
जयाचेनि ज्ञानविचारु । कळों लागे ॥ ३॥
श्रोतेन पुसिलें बरवें । भगवद्भजन कैसें करावें ।
म्हणौनि बोलिलें स्वभावें । ग्रंथांतरीं ॥ ४॥
सावध होऊन श्रोतेजन । ऐका नवविधा भजन ।
सत्शास्त्रीं बोलिले, पावन- । होईजे येणें ॥ ५॥
श्लोक ॥ श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् ।
अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥
नवविधा भजन बोलिलें । तेंचि पुढें प्रांजळ केलें ।
श्रोतीं अवधान दिधलें । पाहिजे आतां ॥ ६॥
प्रथम भजन ऐसें जाण । हरिकथापुराणश्रवण ।
नाना अध्यात्मनिरूपण । ऐकत जावें ॥ ७॥
कर्ममार्ग उपासनामार्ग । ज्ञानमार्ग सिद्धांतमार्ग ।
योगमार्ग वैराग्यमार्ग । ऐकत जावे ॥ ८॥
नाना व्रतांचे महिमे । नाना तीर्थांचे महिमे ।
नाना दानांचे महिमे । ऐकत जावे ॥ ९॥
नाना माहात्म्यें नाना स्थानें । नाना मंत्र नाना साधनें ।
नाना तपें पुरश्चरणें । ऐकत जावीं ॥ १०॥
दुग्धाहारी निराहारी । फळाहारी पर्णाहारी ।
तृणाहारी नानाहारी । कैसे ते ऐकावे ॥ ११॥
उष्णवास जळवास । सीतवास आरण्यवास ।
भूगर्भ आणी आकाशवास । कैसे ते ऐकावे ॥ १२॥
जपी तपी तामस योगी । नाना निग्रह हटयोगी ।
शाक्तआगम आघोरयोगी । कैसे ते ऐकावे ॥ १३॥
नाना मुद्रा नाना आसनें । नाना देखणीं लक्षस्थानें ।
पिंडज्ञानें तत्वज्ञानें । कैसीं तें ऐकावीं ॥ १४॥
नाना पिंडांची रचना । नाना भूगोळरचना ।
नाना सृष्टीची रचना । कैसी ते ऐकावी ॥ १५॥
चंद्र सूर्य तारामंडळें । ग्रहमंडळें मेघमंडळें ।
येकवीस स्वर्गें सप्त पाताळें । कैसीं ते ऐकावीं ॥ १६॥
ब्रह्माविष्णुमहेशस्थानें । इन्द्रदेवऋषीस्थानें ।
वायोवरुणकुबेरस्थानें । कैसीं ते ऐकावीं ॥ १७॥
नव खंडे चौदा भुवनें । अष्ट दिग्पाळांची स्थानें ।
नाना वनें उपवनें गहनें । कैसीं ते ऐकावीं ॥ १८॥
गण गंधर्व विद्याधर । येक्ष किन्नर नारद तुंबर ।
अष्ट नायका संगीतविचार । कैसा तो ऐकावा ॥ १९॥
रागज्ञान ताळज्ञान । नृत्यज्ञान वाद्यज्ञान ।
अमृतवेळ प्रसंगज्ञान । कैसें तें ऐकावें ॥ २०॥
चौदा विद्या चौसष्टी कळा । सामुद्रिक लक्षणें सकळ कळा ।
बत्तीस लक्षणें नाना कळा । कैशा त्या ऐकाव्या ॥ २१॥
मंत्र मोहरे तोटके सिद्धी । नाना वल्ली नाना औषधी ।
धातु रसायण बुद्धी । नाडिज्ञानें ऐकावीं ॥ २२॥
कोण्या दोषें कोण रोग । कोणा रोगास कोण प्रयोग ।
कोण्या प्रयोगास कोण योग । साधे तो ऐकावा ॥ २३॥
रवरवादि कुंभपाक । नाना यातना येमेलोक ।
सुखसुःखादि स्वर्गनर्क । कैसा तो ऐकावा ॥ २४॥
कैशा नवविधा भक्ती । कैशा चतुर्विधा मुक्ती ।
कैसी पाविजे उत्तम गती । ऐसें हें ऐकावें ॥ २५॥
पिंडब्रह्मांडाची रचना । नाना तत्वविवंचना ।
सारासारविचारणा । कैसी ते ऐकावी ॥ २६॥
सायोज्यता मुक्ती कैसी होते । कैसें पाविजे मोक्षातें ।
याकारणें नाना मतें । शोधित जावीं ॥ २७॥
वेद शास्त्रें आणी पुराणें । माहावाक्याचीं विवरणें ।
तनुशतुष्टयनिर्शनें । कैसीं ते ऐकावीं ॥ २८॥
ऐसें हें अवघेंचि ऐकावें । परंतु सार शोधून घ्यावें ।
असार तें जाणोनि त्यागावें । या नांव श्रवणभक्ति ॥ २९॥
सगुणाचीं चरित्रें ऐकावीं । कां तें निर्गुण अध्यात्में
शोधावीं ।
श्रवणभक्तीचीं जाणावीं । लक्षणें ऐसीं ॥ ३०॥
सगुण देवांचीं चरित्रें । निर्गुणाचीं तत्वें यंत्रें ।
हे दोनी परम पवित्रें । ऐकत जावीं ॥ ३१॥
जयंत्या उपोषणें नाना साधनें । मंत्र यंत्र जप ध्यानें ।
कीर्ति स्तुती स्तवनें भजनें । नानाविधें ऐकावीं ॥ ३२॥
ऐसें श्रवण सगुणाचें । अध्यात्मनिरूपण निर्गुणाचें ।
विभक्ती सांडून भक्तीचें । मूळ शोधावें ॥ ३३॥
श्रवणभक्तीचें निरूपण । निरोपिलें असे जाण ।
पुढें कीर्तन भजनाचें लक्षण । बोलिलें असे ॥ ३४॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे श्रवणभक्तिनिरूपणनाम

समास पहिला ॥१॥ ४.१

समास दुसरा : किर्तन भक्ति

॥ श्रीराम ॥

श्रोतीं भगवद्भजन पुसिलें । तें नवविधा प्रकारें बोलिलें ।
त्यांत प्रथम श्रवण निरोपिलें । दुसरें कीर्तन ऐका ॥ १ ॥
सगुण हरिकथा करावी । भगवत्कीर्ती वाढवावी ।
अखंड वैखरी वदवावी । येथायोग्य ॥ २ ॥
बहुत करावें पाठांतर । कंठीं धरावें ग्रन्थांतर ।
भगवत्कथा निरंतर । करीत जावी ॥ ३ ॥
अपुलिया सुखस्वार्था । केलीच करावी हरिकथा ।
हरिकथेवीण सर्वथा । राहोंचि नये ॥ ४ ॥
नित्य नवा हव्यास धरावा । साक्षेप अत्यंतचि करावा ।
हरिकीर्तनें भरावा । ब्रह्मगोळ अवघा ॥ ५ ॥
मनापासून आवडी । जीवापासून अत्यंत गोडी ।
सदा सर्वदा तांतडी । हरिकीर्तनाची ॥ ६ ॥
भगवंतास कीर्तन प्रिये । कीर्तनें समाधान होये ।
बहुत जनासी उपाये । हरिकीर्तनें कलयुगीं ॥ ७ ॥
विविध विचित्रें ध्यानें । वर्णावीं आळंकार भूषणें ।
ध्यानमूर्ति अंतःकरणें- । लक्षून, कथा करावी ॥ ८ ॥
येश कीर्ति प्रताप महिमा । आवडीं वर्णावा परमात्मा ।
जेणें भगवद्भक्तांचा आत्मा । संतुष्ट होये ॥ ९ ॥
कथा अन्वय लापणिका । नामघोष करताळिका ।
प्रसंगें बोलाव्या अनेका । धात माता नेमस्त ॥ १० ॥
ताळ मृदांग हरिकीर्तन । संगीत नृत्य तान मान ।
नाना कथानुसंधान । तुटोंचि नेदावें ॥ ११ ॥
करुणा कीर्तनाच्या लोटें । कथा करावी घडघडाटें ।
श्रोतयांचीं श्रवणपुटें । आनंदें भरावीं ॥ १२ ॥
कंप रोमांच स्फुराणें । प्रेमाश्रुसहित गाणें ।
देवद्वारीं लोटांगणें । नमस्कार घालावे ॥ १३ ॥
पदें दोहडें श्लोक प्रबंद । धाटी मुद्रा अनेक छंद ।
बीरभाटिंव विनोद । प्रसंगें करावे ॥ १४ ॥
नाना नवरसिक शृंघारिक । गद्यपद्याचें कौतुक ।
नाना वचनें प्रस्ताविक । शास्त्राधारें बोलावीं ॥ १५ ॥
भक्तिज्ञान वैराग्य लक्षण । नीतिन्यायस्वधर्मरक्षण ।
साधनमार्ग अध्यात्मनिरूपण । प्रांजळ बोलावें ॥ १६ ॥
प्रसंगें हरिकथा करावी । सगुणीं सगुणकीर्ति धरावी ।
निर्गुणप्रसंगें वाढवावी । अध्यात्मविद्या ॥ १७ ॥
पूर्वपक्ष त्यागून, सिद्धांत- । निरूपण करावें नेमस्त ।
बहुधा बोलणें अव्यावेस्त । बोलोंचि नये ॥ १८ ॥
करावें वेदपारायेण । सांगावें जनासी पुराण ।
मायाब्रह्मीचें विवरण । साकल्य वदावें ॥ १९ ॥
ब्राह्मण्य रक्षावें आदरें । उपासनेचीं भजनद्वारें ।
गुरुपरंपरा निर्धारें । चळोंच नेदावी ॥ २० ॥
करावें वैराग्यरक्षण । रक्षावें ज्ञानाचें लक्षण ।
परम दक्ष विचक्षण । सर्वहि सांभाळी ॥ २१ ॥
कीर्तन ऐकतां संदेह पडे । सत्य समाधान तें उडे ।
नीतिन्यायसाधन मोडे । ऐसें न बोलावें ॥ २२ ॥
सगुणकथा या नांव कीर्तन । अद्वैत म्हणिजे निरूपण ।
सगुण रक्षून निर्गुण । बोलत जावें ॥ २३ ॥
असो वग्त्रृत्वाचा अधिकार । अल्पास न घडे सत्योत्तर ।
वक्ता पाहिजे साचार । अनुभवाचा ॥ २४ ॥
सकळ रक्षून ज्ञान सांगे । जेणें वेदज्ञा न भंगे ।
उत्तम सन्मार्ग लागे । प्राणीमात्रासी ॥ २५ ॥
असो हें सकळ सांडून । करावें गुणानुवादकीर्तन ।
या नांव भगवद्भजन । दुसरी भक्ती ॥ २६ ॥
कीर्तनें माहादोष जाती । कीर्तनें होये उत्तमगती ।
कीर्तनें भगवत्प्राप्ती । येदर्थी संदेह नाहीं ॥ २७ ॥
कीर्तनें वाचा पवित्र । कीर्तनें होये सत्पात्र ।
हरिकीर्तनें प्राणीमात्र । सुसिळ होती ॥ २८ ॥
कीर्तनें अवेग्रता घडे । कीर्तनें निश्चये सांपडे ।
कीर्तनें संदेह बुडे । श्रोतयांवक्तयांचा ॥ २९ ॥
सदा सर्वदा हरिकीर्तन । ब्रह्मसुत करी आपण ।
तेणें नारद तोचि नारायेण । बोलिजेत आहे ॥ ३० ॥
म्हणोनि कीर्तनाचा अगाध महिमा । कीर्तनें संतोषे परमात्मा ।
सकळ तीर्थें आणी जगदात्मा । हरिकीर्तनीं वसे ॥ ३१ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे कीर्तनभजननिरूपणनाम

समास दुसरा ॥ २ ॥ ४.२

समास तिसरा : नामस्मरणभक्ति

॥ श्रीराम ॥

मागां निरोपिलें कीर्तन । जें सकळांस करी पावन ।
आतां ऐका विष्णोःस्मरण । तिसरी भक्ती ॥ १ ॥
स्मरण देवाचें करावें । अखंड नाम जपत जावें ।
नामस्मरणें पावावें । समाधान ॥ २ ॥
नित्य नेम प्रातःकाळीं । माध्यानकाळीं सायंकाळीं ।
नामस्मरण सर्वकाळीं । करीत जावें ॥ ३ ॥
सुख दुःख उद्वेग चिंता । अथवा आनंदरूप असतां ।
नामस्मरणेंविण सर्वथा । राहोंच नये ॥ ४ ॥
हरुषकाळीं विषमकाळीं । पर्वकाळीं प्रस्तावकाळीं ।
विश्रांतिकाळीं निद्राकाळीं । नामस्मरण करावें ॥ ५ ॥
कोडें सांकडें संकट । नाना संसारखटपट ।
आवस्ता लागतां चटपट । नामस्मरण करावें ॥ ६ ॥
चालतां बोलतां धंदा करितां । खातां जेवितां सुखी
होतां ।
नाना उपभोग भोगितां । नाम विसरों नये ॥ ७ ॥
संपत्ती अथवा विपत्ती । जैसी पडेल काळगती ।
नामस्मरणाची स्थिती । सांडूंच नये ॥ ८ ॥

वैभव सामर्थ्य आणी सत्ता । नाना पदार्थ चालतां ।
उत्कट भाग्यश्री भोगितां । नामस्मरण सांडूं नये ॥ ९ ॥
आधीं आवदसा मग दसा । अथवा दसेउपरी आवदसा ।
प्रसंग असो भलतैसा । परंतु नाम सोडूं नये ॥ १० ॥
नामें संकटें नासतीं । नामें विघ्नें निवारती ।
नामस्मरणें पाविजेती । उत्तम पदें ॥ ११ ॥
भूत पिशाच्च नाना छंद । ब्रह्मगिऱ्हो ब्राह्मणसमंध ।
मंत्रचळ नाना खेद । नामनिष्ठें नासती ॥ १२ ॥
नामें विषबाधा हरती । नामें चेडे चेटकें नासती ।
नामें होये उत्तम गती । अंतकाळीं ॥ १३ ॥
बाळपणीं तारुण्यकाळीं । कठिणकाळीं वृधाप्यकाळीं ।
सर्वकाळीं अंतकाळीं । नामस्मरण असावें ॥ १४ ॥
नामाचा महिमा जाणे शंकर । जना उपदेसी विश्वेश्वर ।
वाराणसी मुक्तिक्षेत्र । रामनामेंकरूनी ॥ १५ ॥
उफराट्या नामासाठीं । वाल्मिक तरला उठाउठी ।
भविष्य वदला शतकोटी । चरित्र रघुनाथाचें ॥ १६ ॥
हरिनामें प्रल्हाद तरला । नाना आघातापासून सुटला ।
नारायेणनामें पावन जाला । अजामेळ ॥ १७ ॥
नामें पाषाण तरले । असंख्यात भक्त उद्धरले ।
माहापापी तेचि जाले । परम पवित्र ॥ १८ ॥
परमेश्वराचीं अनंत नामें । स्मरतां तरिजे नित्यनेमें ।
नामस्मरण करितां, येमें- । बाधिजेना ॥ १९ ॥
सहस्रा नामामधें कोणी येक । म्हणतां होतसे सार्थक ।
नाम स्मरतां पुण्यश्लोक । होईजे स्वयें ॥ २० ॥
कांहींच न करूनि प्राणी । रामनाम जपे वाणी ।
तेणें संतुष्ट चक्रपाणी । भक्तांलागीं सांभाळी ॥ २१ ॥
नाम स्मरे निरंतर । तें जाणावें पुण्यशरीर ।
माहादोषांचे गिरिवर । रामनामें नासती ॥ २२ ॥
अगाध महिमा न वचे वदला । नामें बहुत जन उद्धरला ।
हळहळापासून सुटला । प्रत्यक्ष चंद्रमौळी ॥ २३ ॥
चहुं वर्णां नामाधिकार । नामीं नाहीं लाहानथोर ।
जढ मूढ पैलपार । पावती नामें ॥ २४ ॥
म्हणौन नाम अखंड स्मरावें । रूप मनीं आठवावें ।
तिसरी भक्ती स्वभावें । निरोपिली ॥ २५ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे नामस्मरणभक्तिनिरूपणनाम
समास तिसरा ॥ ३ ॥ ४.३

समास चवथा : पादसेवन भक्ति
॥ श्रीराम ॥
मागां जालें निरूपण । नामस्मरणाचें लक्षण ।
आतां ऐका पादसेवन । चौथी भक्ती ॥ १ ॥
पादसेवन तेंचि जाणावें । कायावाचामनोभावें ।
सद्‌गुरूचे पाय सेवावे । सद्‌गतिकारणें ॥ २ ॥
या नांव पादसेवन । सद्‌गुरुपदीं अनन्यपण ।
निरसावया जन्ममरण । यातायाती ॥ ३ ॥
सद्‌गुरुकृपेविण कांहीं । भवतरणोपाव तों नाहीं ।
याकारणें लवलाहीं । सद्‌गुरुपाय सेवावे ॥ ४ ॥
सद्वस्तु दाखवी सद्‌गुरु । सकळ सारासारविचारु ।
परब्रह्माचा निर्धारु । अंतरीं बाणे ॥ ५ ॥
जे वस्तु दृष्टीस दिसेना । आणी मनास तेहि भासेना ।
संगत्यागेंविण ये ना । अनुभवासी ॥ ६ ॥
अनुभव घेतां संगत्याग नसे । संगत्यागें अनुभव न दिसे ।
हें अनुभवी यासीच भासे । येरां गथागोवी ॥ ७ ॥
संगत्याग आणी निवेदन । विदेहस्थिती अलिप्तपण ।
सहजस्थिती उन्मनी विज्ञान । हे सप्तहि येकरूप ॥ ८ ॥
याहिवेगळीं नामाभिधानें । समाधानाचीं संकेतवचनें ।
सकळ कांहीं पादसेवनें । उमजों लागे ॥ ९ ॥
वेद वेदगर्भ वेदांत । सिद्ध सिद्धभावगर्भ सिद्धांत ।
अनुभव अनुर्वाच्य धादांत । सत्य वस्तु ॥ १० ॥
बहुधा अनुभवाचीं आंगें । सकळ कळती संतसंगें ।
चौथे भक्तीचे प्रसंगें । गोप्य तें प्रगटे ॥ ११ ॥
प्रगट वसोनि नसे । गोप्य असोनि भासे ।
भासाअभासाहून अनारिसे । गुरुगम्य मार्ग ॥ १२ ॥
मार्ग होये परी अंतरिक्ष । जेथें सर्वहि पूर्वपक्ष ।
पाहों जातां अलक्ष । लक्षवेना ॥ १३ ॥
लक्षें जयासी लक्षावें । ध्यानें जयासी ध्यावें ।
तें गे तेंचि आपण व्हावें । त्रिविधा प्रचिती ॥ १४ ॥
असो हीं अनुभवाचीं द्वारें । कळती सारासारविचारें ।
सत्संगेंकरून सत्योत्तरें । प्रत्ययासि येतीं ॥ १५ ॥
सत्य पाहातां नाहीं असत्य । असत्य पाहातां नाहीं सत्य ।
सत्याअसत्याचें कृत्य । पाहाणारापासीं ॥ १६ ॥
पाहाणार पाहाणें जया लागलें । तें तद्रूपत्वें प्राप्त जालें ।
तरी मग जाणावें बाणलें । समाधान ॥ १७ ॥
नाना समाधानें पाहातां । बाणती सद्‌गुरु करितां ।
सद्‌गुरुविण सर्वथा । सन्मार्ग नसे ॥ १८ ॥
प्रयोग साधनें सायास । नाना साक्षेपें विद्याअभ्यास ।
अभ्यासें कांहीं गुरुगम्यास । पाविजेत नाहीं ॥ १९ ॥
जें अभ्यासें अभ्यासितां न ये । जें साधनें असाध्य होये ।
तें हें सद्‌गुरुविण काये । उमजों जाणे ॥ २० ॥
याकारणें ज्ञानमार्ग- । कळाया, धरावा सत्संग ।
सत्संगेंविण प्रसंग । बोलोंचि नये ॥ २१ ॥
सेवावे सद्‌गुरूचे चरण । या नांव पादसेवन ।
चौथे भक्तीचें लक्षण । तें हें निरोपिलें ॥ २२ ॥
देव ब्राह्मण माहानुभाव । सत्पात्र भजनाचे ठाव ।
ऐसिये ठाईं सद्‌भाव । दृढ धरावा ॥ २३ ॥
हें प्रवृत्तीचें बोलणें । बोलिलें रक्षाया कारणें ।
परंतु सद्‌गुरुपाय सेवणें । या नांव पादसेवन ॥ २४ ॥

पादसेवन चौथी भक्ती । पावन करितसे त्रिजगतीं ।
जयेकरितां सायोज्यमुक्ती । साधकास होये ॥ २५ ॥
म्हणौनि थोराहून थोर । चौथे भक्तीचा निर्धार ।
जयेकरितां पैलपार । बहुत प्राणी पावती ॥ २६ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे पादसेवनभक्तिनिरूपणनाम
समास चवथा ॥ ४ ॥ ४.४

समास पांचवा : अर्चनभक्ति
॥ श्रीराम ॥
मागां जालें निरूपण । चौथे भक्तीचें लक्षण ।
आतां ऐका सावधान । पांचवी भक्ती ॥ १ ॥
पांचवी भक्ती तें आर्चन । आर्चन म्हणिजे देवतार्चन ।
शास्त्रोक्त पूजाविधान । केलें पाहिजे ॥ २ ॥
नाना आसनें उपकर्णें । वस्त्रें आळंकार भूषणें ।
मानसपूजा मूर्तिध्यानें । या नांव पांचवी भक्ती ॥ ३ ॥
देवब्राह्मणअग्नीपूजन । साधुसंतअतीतपूजन ।
इति महानुभाव गाइत्रीपूजन । या नांव पांचवी भक्ती ॥ ४ ॥
धातुपाषाणमृत्तिकापूजन । चित्र लेप सत्पात्रपूजन ।
आपले गृहींचें देवतार्चन । या नांव पांचवी भक्ती ॥ ५ ॥
सीळा सप्तांकित नवांकित । शालिग्राम शकलें चक्रांकित ।
लिंगें सूर्यकांत सोमकांत । बाण तांदळे नर्बदे ॥ ६ ॥
भैरव भगवती मल्लारी । मुंज्या नृसिंह बनशंकरी ।
नाग नाणी नानापरी । पंचायेत्नपूजा ॥ ७ ॥
गणेशशारदाविठलमूर्ती । रंगनाथजगंनाथतांडवमूर्ती ।
श्रीरंगहनुमंतगरुडमूर्ती । देवतार्चनीं पूजाव्या ॥ ८ ॥
मत्छकूर्मवऱ्हावमूर्ती । नृसिंहवामनभार्गवमूर्ती ।
रामकृष्णहयग्रीवमूर्ती । देवतार्चनीं पूजाव्या ॥ ९ ॥
केशवनारायणमाधवमूर्ती । गोविंदविष्णुमदसूदनमूर्ती ।
त्रिविक्रमवामनश्रीधरमूर्ती । रुषीकेश पद्मनाभि ॥ १० ॥
दामोदरसंकर्षणवासुदेवमूर्ती ।
प्रद्युम्नअनुरधपुरुषोत्तममूर्ती ।
अधोक्षजनारसिंहअच्युतमूर्ती । जनार्दन आणी उपेंद्र ॥ ११ ॥
हरिहरांच्या अनंत मूर्ती । भगवंत जगदात्माजगदीशमूर्ती ।
शिवशक्तीच्या बहुधा मूर्ती । देवतार्चनीं पूजाव्या ॥ १२ ॥
अश्वत्थनारायेण सूर्यनारायेण । लक्ष्मीनारायेण त्रिमल्लनारायेण ।
श्रीहरीनारायण आदिनारायण । शेषशाई परमात्मा ॥ १३ ॥
ऐश्या परमेश्वराच्या मूर्ती । पाहों जातां उदंड असती ।
त्यांचें आर्चन करावें, भक्ती- । पांचवी ऐसी ॥ १४ ॥
याहि वेगळे कुळधर्म । सोडूं नये अनुक्रम ।
उत्तम अथवा मध्यम । करीत जावें ॥ १५ ॥
जाखमाता मायराणी । बाळा बगुळा मानविणी ।
पूजा मांगिणी जोगिणी । कुळधर्में करावीं ॥ १६ ॥
नाना तीर्थांक्षत्रांस जावें । तेथें त्या देवाचें पूजन
करावें ।
नाना उपचारीं आर्चावें । परमेश्वरासी ॥ १७ ॥
पंचामृतें गंधाक्षतें । पुष्पें परिमळद्रव्यें बहुतें ।
धूपदीप असंख्यातें । नीरांजनें कर्पुराचीं ॥ १८ ॥
नाना खाद्य नैवेद्य सुंदर । नाना फळें तांबोलप्रकार ।
दक्षणा नाना आळंकार । दिव्यांबरें वनमाळा ॥ १९ ॥
सिबिका छत्रें सुखासनें । माहि मेघडंब्रें सूर्यापानें ।
दिंड्या पताका निशाणें । टाळ घोळ मृदांग ॥ २० ॥
नाना वाद्यें नाना उत्साव । नाना भक्तसमुदाव ।
गाती हरिदास सद्भाव- । लागला भगवंतीं ॥ २१ ॥
वापी कूप सरोवरें । नाना देवाळयें सिखरें ।
राजांगणें मनोहरें । वृंदावनें भुयरीं ॥ २२ ॥
मठ मंड्या धर्मशाळा । देवद्वारीं पडशाळा ।
नाना उपकर्णें नक्षत्रमाळा । नाना वस्त्र सामुग्री ॥ २३ ॥
नाना पडदे मंडप चांदोवे । नाना रत्नघोष लोंबती बरवे ।
नाना देवाळई समर्पावे । हस्थि घोडे शक्कटें ॥ २४ ॥
आळंकार आणि आळंकारपात्रें । द्रव्य आणी द्रव्यपात्रें ।
अन्नोदक आणी अन्नोदकपात्रें । नाना प्रकारीचीं ॥ २५ ॥
वनें उपवनें पुष्पवाटिका । तापस्यांच्या पर्णकुटिका ।
ऐसी पूजा जगन्नायका । येथासांग समर्पावी ॥ २६ ॥
शुक शारिका मयोरें । बदकें चक्रवाकें चकोरें ।
कोकिळा चितळें सामरें । देवाळई समर्पावीं ॥ २७ ॥
सुगंधमृगें आणी मार्जरें । गाई म्हैसी वृषभ वानरें ।
नाना पदार्थ आणी लेंकुरें । देवाळई समर्पावीं ॥ २८ ॥
काया वाचा आणी मनें । चित्तें वित्तें जीवें प्राणें ।
सद्भावें भगवंत आर्चनें । या नांव आर्चनभक्ती ॥ २९ ॥
ऐसेंचि सद्गुरूचें भजन- । करून, असावें अनन्य ।
या नांव भगवद्भजन । पांचवी भक्ती ॥ ३० ॥
ऐसी पूजा न घडे बरवी । तरी मानसपूजा करावी ।
मानसपूजा अगत्य व्हावी । परमेश्वरासी ॥ ३१ ॥
मनें भगवंतास पूजावें । कल्पून सर्वहि समर्पावें ।
मानसपूजेचें जाणावें । लक्षण ऐसें ॥ ३२ ॥
जें जें आपणांस पाहिजे । तें तें कल्पून वाहिजे ।
येणें प्रकारें कीजे । मानसपूजा ॥ ३३ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आर्चनभक्तिनाम
समास पांचवा ॥ ५ ॥ ४.५

समास सहावा : वंदनभक्ति
॥ श्रीराम ॥
मागां जालें निरूपण । पांचवे भक्तीचें लक्षण ।
आतां ऐका सावधान । साहावी भक्ती ॥ १ ॥
साहावी भक्ती तें वंदन । करावें देवासी नमन ।
संत साधु आणी सज्जन । नमस्कारीत जावे ॥ २ ॥
सूर्यासि करावे नमस्कार । देवासि करावे नमस्कार ।
सद्गुरूस करावे नमस्कार । साष्टांग भावें ॥ ३ ॥

साष्टांग नमस्कारास अधिकारु । नानाप्रतिमा देव गुरु ।
अन्यत्र नमनाचा विचारु । अधिकारें करावा ॥ ४॥
छपन्न कोटी वसुमती । मधें विष्णुमूर्ती असती ।
तयांस नमस्कार प्रीतीं । साष्टांग घालावे ॥ ५॥
पशुपति श्रीपति आणी गभस्ती । यांच्या दर्शनें दोष जाती ।
तैसाचि नमावा मारुती । नित्य नेमें विशेष ॥ ६॥
श्लोक ॥ शंकरः शेषशायी च मार्तंडो मारुतिस्तथा ।
एतेषां दर्शनं पुण्यं नित्यनेमे विशेषतः ॥
भक्त ज्ञानी आणी वीतरागी । माहानुभाव तापसी योगी ।
सत्पात्रें देखोनि वेगीं । नमस्कार घालावे ॥ ७॥
वेदज्ञ शास्त्रज्ञ आणी सर्वज्ञ । पंडित पुराणिक आणी विद्वज्जन ।
याज्ञिक वैदिक पवित्रजन । नमस्कारीत जावे ॥ ८॥
जेथें दिसती विशेष गुण । तें सद्गुरूचें अधिष्ठान ।
याकारणें तयासी नमन । अत्यादरें करावें ॥ ९॥
गणेश शारदा नाना शक्ती । हरिहरांच्या अवतारमूर्ती ।
नाना देव सांगों किती । पृथकाकारें ॥ १०॥
सर्व देवांस नमस्कारिलें । ते येका भगवंतास पावलें ।
येदर्थी येक वचन बोलिलें- । आहे, तें ऐका ॥ ११॥
श्लोक ॥ आकाशात्पतितं तोयं यथा गच्छति सागरं ।
सर्वदेवनमस्कारः केशवं प्रतिगच्छति ॥
याकारणें सर्व देवांसी । नमस्कारावें अत्यादरेंसीं ।
अधिष्ठान मानितां, देवांसी- । परम सौख्य वाटे ॥ १२॥
देव देवाचीं अधिष्ठानें । सत्पात्रें सद्गुरूचीं स्थानें ।
या कारणें नमस्कार करणें । उभय मार्गीं ॥ १३॥
नमस्कारें लीनता घडे । नमस्कारें विकल्प मोडे ।
नमस्कारें सख्य घडे । नाना सत्पात्रासीं ॥ १४॥
नमस्कारें दोष जाती । नमस्कारें अन्याय क्ष्मती ।
नमस्कारें मोडलीं जडतीं । समाधानें ॥ १५॥
सिसापरता नाहीं दंड । ऐसें बोलती उदंड ।
याकारणें अखंड । देव भक्त वंदावे ॥ १६॥
नमस्कारें कृपा उचंबळे । नमस्कारें प्रसन्नता प्रबळे ।
नमस्कारें गुरुदेव वोळे । साधकांवरीं ॥ १७॥
निशेष करितां नमस्कार । नासती दोषांचे गिरिवर ।
आणी मुख्य परमेश्वर । कृपा करी ॥ १८॥
नमस्कारें पतित पावन । नमस्कारें संतांसी शरण ।
नमस्कारें जन्ममरण । दुरी दुऱ्हावे ॥ १९॥
परम अन्याय करुनि आला । आणी साष्टांग नमस्कार घातला ।
तरी तो अन्याये क्ष्मा केला । पाहिजे श्रेष्ठीं ॥ २०॥
याकारणें नमस्कारापरतें । आणीक नाहीं अनुसरतें ।
नमस्कारें प्राणीयातें । सद्बुद्धि लागे ॥ २१॥
नमस्कारास वेचावें नलगे । नमस्कारास कष्टावें नलगे ।
नमस्कारांस कांहींच नलगे । उपकर्ण सामग्री ॥ २२॥
नमस्कारा ऐसें नाहीं सोपें । नमस्कार करावा अनन्यरूपें ।
नाना साधनीं साक्षपें । कासया सिणावें ॥ २३॥
साधक भावें नमस्कार घाली । त्याची चिंता साधूस लागली ।
सुगम पंथे नेऊन घाली । जेथील तेथें ॥ २४॥
याकारणें नमस्कार श्रेष्ठ । नमस्कारें वोळती वरिष्ठ ।
येथें सांगितली पष्ट । साहावी भक्ती ॥ २५॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे वंदनभक्तिनाम
समास सहावा ॥ ६॥ ४.६

समास सातवा : दास्यभक्ति
॥ श्रीराम ॥
मागां जालें निरूपण । साहवें भक्तीचें लक्षण ।
आतां ऐका सावधान । सातवी भक्ती ॥ १॥
सातवें भजन तें दास्य जाणावें । पडिलें कार्य तितुकें
करावें ।
सदा सन्निधचि असावें । देवद्वारीं ॥ २॥
देवाचें वैभव संभाळावें । न्यूनपूर्ण पडोंचि नेदावें ।
चढतें वाढतें वाढवावें । भजन देवाचें ॥ ३॥
भंगलीं देवाळयें करावीं । मोडलीं सरोवरें बांधावीं ।
सोफे धर्मशाळा चालवावीं । नूतनचि कार्यें ॥ ४॥
नाना रचना जीर्ण जर्जर । त्यांचे करावे जीर्णोद्धार ।
पडिलें कार्य तें सत्वर । चालवित जावें ॥ ५॥
गज रथ तुरंग सिंहासनें । चौकिया सिबिका सुखासनें ।
मंचक डोल्हारे विमानें । नूतनचि करावीं ॥ ६॥
मेघडंब्रें छत्रें चामरें । सूर्यापानें निशाणें अपारें ।
नित्य नूतन अत्यादरें । सांभाळित जावीं ॥ ७॥
नाना प्रकारीचीं यानें । बैसावयाचीं उत्तम स्थानें ।
बहुविध सुवर्णासनें । येत्नें करीत जावीं ॥ ८॥
भुवनें कोठड्या पेट्या मांदुसा । रांझण कोहळीं
घागरी बहुवसा ।
संपूर्ण द्रव्यांश ऐसा । अति येत्नें करावा ॥ ९॥
भुयेरीं तळघरें आणी विवरें । नाना स्थळें गुप्त द्वारें ।
अनर्घ्ये वस्तूंचीं भांडारें । येत्नें करीत जावीं ॥ १०॥
आळंकार भूषणें दिव्यांबरें । नाना रत्नें मनोहरें ।
नाना धातु सुवर्णपात्रें । येत्नें करीत जावीं ॥ ११॥
पुष्पवाटिका नाना वनें । नाना तरुवरांचीं बनें ।
पावतीं करावीं जीवनें । तया वृक्षांसी ॥ १२॥
नाना पशूंचिया शाळा । नाना पक्षी चित्रशाळा ।
नाना वाद्यें नाट्यशाळा । गुणी गायेक बहुसाल ॥ १३॥
स्वयंपाकगृहें भोजनशाळा । सामग्रीगृहें धर्मशाळा ।
निद्रिस्तांकारणें पडशाळा । विशाळ स्थळें ॥ १४॥
नाना परिमळद्रव्यांचीं स्थळें । नाना
खाद्यफळांचीं स्थळें ।
नाना रसांचीं नाना स्थळें । येत्नें करीत जावीं ॥ १५॥
नाना वस्तांची नाना स्थानें । भंगलीं करावीं नूतनें ।

देवाचें वैभव वचनें । किती म्हणौनि बोलावें ॥ १६ ॥
सर्वां ठाई अतिसादर । आणी दास्यत्वासहि तत्पर ।
कार्यभागाचा विसर । पडणार नाहीं ॥ १७ ॥
जयंत्या पर्वें मोहोत्साव । असंभाव्य चालवी वैभव ।
जें देखतां स्वर्गींचे देव । तटस्त होती ॥ १८ ॥
ऐसें वैभव चालवावें । आणी नीच दास्यत्वहि करावें ।
पडिले प्रसंगीं सावध असावें । सर्वकाळ ॥ १९ ॥
जें जें कांहीं पाहिजे । तें तें तत्काळचि देजे ।
अत्यंत आवडीं कीजे । सकळ सेवा ॥ २० ॥
चरणक्षाळणें स्नानें आच्मनें । गंधाक्षतें वसनें भूषणें ।
आसनें जीवनें नाना सुमनें । धूप दीप नैवेद्य ॥ २१ ॥
शयेनाकारणें उत्तम स्थळें । जळें ठेवावीं सुसीतळें ।
तांबोल गायनें रसाळें । रागरंगें करावीं ॥ २२ ॥
परिमळद्रव्यें आणी फुलेलें । नाना सुगंधेल तेलें ।
खाद्य फळें बहुसालें । सन्निधचि असावीं ॥ २३ ॥
सडे संमार्जनें करावीं । उदकपात्रें उदकें भरावीं ।
वसनें प्रक्षालून आणावीं । उत्तमोत्तमें ॥ २४ ॥
सकळांचें करावें पारपत्य । आलयाचें करावें आतित्य ।
ऐसी हे जाणावी सत्य । सातवी भक्ती ॥ २५ ॥
वचनें बोलावीं करुणेचीं । नाना प्रकारें स्तुतीचीं ।
अंतरें निवतीं सकळांचीं । ऐसें वदावें ॥ २६ ॥
ऐसी हे सातवी भक्ती । निरोपिली येथामती ।
प्रत्यक्ष न घडे तरी चित्तीं । मानसपूजा करावी ॥ २७ ॥
ऐसें दास्य करावें देवाचें । येणेंचि प्रकारें सद्गुरूचें ।
प्रत्यक्ष न घडे तरी मानसपूजेचें । करित जावें ॥ २८ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे दास्यभक्तिनाम
समास सातवा ॥ ७ ॥ ४.७

समास आठवा : सख्यभक्ति

॥ श्रीराम ॥

मागां जालें निरूपण । सातवे भक्तीचें लक्षण ।
आतां ऐका सावधान । आठवी भक्ती ॥ १ ॥
देवासी परम सख्य करावें । प्रेम प्रीतीनें बांधावें ।
आठवे भक्तीचें जाणावें । लक्षण ऐसें ॥ २ ॥
देवास जयाची अत्यंत प्रीती । आपण वर्तावें तेणें रीतीं ।
येणें करितां भगवंतीं । सख्य घडे नेमस्त ॥ ३ ॥
भक्ति भाव आणी भजन । निरूपण आणी कथाकीर्तन ।
प्रेमळ भक्तांचें गायन । आवडे देवा ॥ ४ ॥
आपण तैसेंचि वर्तावें । आपणासि तेंच आवडावें ।
मनासारिखें होतां स्वभावें । सख्य घडे नेमस्त ॥ ५ ॥
देवाच्या सख्यत्वाकारणें । आपलें सौख्य सोडून देणें ।
अनन्यभावें जीवें प्राणें । शरीर तेंहि वेंचावें ॥ ६ ॥
सांडून आपली संसारवेथा । करित जावी देवाची चिंता ।
निरूपण कीर्तन कथा वार्ता । देवाच्याचि सांगाव्या ॥ ७ ॥
देवाच्या सख्यत्वासाठीं । पडाव्या जिवलगांसी तुटी ।
सर्व अर्पावें, सेवटीं- । प्राण तोहि वेचावा ॥ ८ ॥
आपुलें आवघेंचि जावें । परी देवासी सख्य राहावें ।
ऐसी प्रीती जिवें भावें । भगवंतीं लागावी ॥ ९ ॥
देव म्हणिजे आपुला प्राण । प्राणासी न करावें निर्वाण ।
परम प्रीतीचें लक्षण । तें हें ऐसें असे ॥ १० ॥
ऐसें परम सख्य धरितां । देवास लागे भक्ताची चिंता ।
पांडव लाखाजोहरीं जळतां । विवरद्वारें काढिले ॥ ११ ॥
देव सख्यत्वें राहे आपणासी । तें तों वर्म आपणाचि पासी ।
आपण वचनें बोलावीं जैसीं । तैसीं येती पडसादें ॥ १२ ॥
आपण असतां अनन्यभावें । देव तत्काळचि पावे ।
आपण त्रास घेतां जीवें । देवहि त्रासे ॥ १३ ॥
श्लोक ॥ ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम् ।
जैसें जयाचे भजन । तैसाचि देवहि आपण ।
म्हणौन हें आवघें जाण । आपणाचि पासीं ॥ १४ ॥
आपुल्या मनासारिखें न घडे । तेणें गुणें निष्ठा मोडे ।
तरी गोष्टी आपणांकडे । सहजचि आली ॥ १५ ॥
मेघ चातकावरी वोळेना । तरी चातक पालटेना ।
चंद्र वेळेसि उगवेना । तऱ्ही चकोर अनन्य ॥ १६ ॥
ऐसें असावें सख्यत्व । विवेकें धरावें सत्व ।
भगवंतावरील ममत्व । सांडूंचि नये ॥ १७ ॥
सखा मानावा भगवंत । माता पिता गण गोत ।
विद्या लक्ष्मी धन वित्त । सकळ परमात्मा ॥ १८ ॥
देवावेगळें कोणीं नाहीं । ऐसें बोलती सर्वहि ।
परंतु त्यांची निष्ठा कांहीं । तैसीच नसे ॥ १९ ॥
म्हणौनी ऐसें न करावें । सख्य तरी खरेंचि करावें ।
अंतरीं सदृढ धरावें । परमेश्वरासी ॥ २० ॥
आपुलिया मनोगताकारणें । देवावरी क्रोधास येणें ।
ऐसीं नव्हेत किं लक्षणें । सख्यभक्तीचीं ॥ २१ ॥
देवाचें जें मनोगत । तेंचि आपुलें उचित ।
इच्छेसाठीं भगवंत । अंतरूं नये कीं ॥ २२ ॥
देवाचे इच्छेनें वर्तावें । देव करील तें मानावें ।
मग सहजचि स्वभावें । कृपाळु देव ॥ २३ ॥
पाहातां देवाचे कृपेसी । मातेची कृपा कायेसी ।
माता वधी बाळकासी । विपत्तिकाळीं ॥ २४ ॥
देवें भक्त कोण वधिला । कधीं देखिला ना ऐकिला ।
शरणागतांस देव जाला । वज्रपंजरु ॥ २५ ॥
देव भक्तांचा कैवारी । देव पतितांसि तारी ।
देव होये साहाकारी । अनाथांचा ॥ २६ ॥
देव अनाथांचा कैपक्षी । नाना संकटांपासून रक्षी ।
धांविन्नला अंतरसाक्षी । गजेंद्राकारणें ॥ २७ ॥
देव कृपेचा सागरु । देव करुणेचा जळधरु ।
देवासि भक्तांचा विसरु । पडणार नाहीं ॥ २८ ॥

देव प्रीती राखों जाणे । देवासी करावें साजणें ।
जिवलगें आवघीं पिसुणें । कामा न येती ॥ २९ ॥
सख्य देवाचें तुटेना । प्रीति देवाची विटेना ।
देव कदा पालटेना । शरणागतांसी ॥ ३० ॥
म्हणौनि सख्य देवासी करावें । हितगुज तयासी सांगावें ।
आठवे भक्तीचें जाणावें । लक्षण ऐसें ॥ ३१ ॥
जैसा देव तैसा गुरु । शास्त्रीं बोलिला हा विचारु ।
म्हणौन सख्यत्वाचा प्रकारु । सद्गुरूसीं असावा ॥ ३२ ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे सख्यभक्तिनाम
समास आठवा ॥ ८ ॥ ४.८

समास नववा : आत्मनिवेदन
॥ श्रीराम ॥
मागां जालें निरूपण । आठवे भक्तीचें लक्षण ।
आतां ऐका सावधान । भक्ति नवमी ॥ १ ॥
नवमी निवेदन जाणावें । आत्मनिवेदन करावें ।
तेंहि सांगिजेल स्वभावें । प्रांजळ करूनि ॥ २ ॥
ऐका निवेदनाचें लक्षण । देवासि वाहावें आपण ।
करावें तत्वविवरण । म्हणिजे कळे ॥ ३ ॥
मी भक्त ऐसें म्हणावें । आणी विभक्तपणेंचि भजावें ।
हें आवघेंचि जाणावें । विलक्षण ॥ ४ ॥
लक्षण असोन विलक्षण । ज्ञान असोन अज्ञान ।
भक्त असोन विभक्तपण । तें हें ऐसें ॥ ५ ॥
भक्त म्हणिजे विभक्त नव्हे । आणी विभक्त म्हणिजे भक्त नव्हे ।
विचारेंविण कांहींच नव्हे । समाधान ॥ ६ ॥
तस्मात् विचार करावा । देव कोण तो वोळखावा ।
आपला आपण शोध घ्यावा । अंतर्यामीं ॥ ७ ॥
मी कोण ऐसा निवाडा । पाहों जातां तत्वझाडा ।
विचार करितां उघडा । आपण नाहीं ॥ ८ ॥
तत्वें तत्व जेव्हां सरे । तेव्हां आपण कैंचा उरे ।
आत्मनिवेदन येणेंप्रकारें । सहजचि जालें ॥ ९ ॥
तत्वरूप सकळ भासे । विवेक पाहातां निरसे ।
प्रकृतिनिरासें आत्मा असे । आपण कैंचा ॥ १० ॥
येक मुख्य परमेश्वरु । दुसरी प्रकृति जगदाकारु ।
तिसरा आपण कैंचा चोरु । आणिला मधें ॥ ११ ॥
ऐसें हें सिद्धचि असतां । नाथिली लागे देहअहंता ।
परंतु विचारें पाहों जातां । कांहींच नसे ॥ १२ ॥
पाहातां तत्वविवेचना । पिंडब्रह्मांडतत्वरचना ।
विश्वाकारें वेक्ती, नाना- । तत्वें विस्तारलीं ॥ १३ ॥
तत्वें साक्षत्वें वोसरतीं । साक्षत्व नुरे आत्मप्रचिती ।
आत्मा असे आदिअंतीं । आपण कैंचा ॥ १४ ॥
आत्मा येक स्वानंदघन । आणी अहमात्मा हें वचन ।
तरी मग आपण कैंचा भिन्न । उरला तेथें ॥ १५ ॥
सोहं हंसा हें उत्तर । याचें पाहावें अर्थांतर ।
पाहातां आत्मयाचा विचार । आपण कैंचा तेथें ॥ १६ ॥
आत्मा निर्गुण निरंजन । तयासी असावें अनन्य ।
अनन्य म्हणिजे नाहीं अन्य । आपण कैंचा तेथें ॥ १७ ॥
आत्मा म्हणिजे तो अद्वैत । जेथें नाहीं द्वैताद्वैत ।
तेथें मीपणाचा हेत । उरेल कैंचा ॥ १८ ॥
आत्मा पूर्णत्वें परिपूर्ण । जेथें नाहीं गुणागुण ।
निखळ निर्गुणी आपण । कोण कैंचा ॥ १९ ॥
त्वंपद तत्पद असिपद । निरसुनि सकळ भेदाभेद ।
वस्तु ठाईची अभेद । आपण कैंचा ॥ २० ॥
निरसितां जीवशिवउपाधी । जीवशिवचि कैंचे आधी ।
स्वरूपीं होतां दृढबुद्धि । आपण कैंचा ॥ २१ ॥
आपण मिथ्या, साच देव । देव भक्त अनन्यभाव ।
या वचनाचा अभिप्राव । अनुभवी जाणती ॥ २२ ॥
या नांव आत्मनिवेदन । ज्ञानियांचें समाधान ।
नवमे भक्तींचे लक्षण । निरोपिलें ॥ २३ ॥
पंचभूतांमध्यें आकाश । सकळ देवांमधें जगदीश ।
नवविधा भक्तीमध्यें विशेष । भक्ति नवमी ॥ २४ ॥
नवमी भक्ती आत्मनिवेदन । न होतां न चुके जन्ममरण ।
हें वचन सत्य, प्रमाण- । अन्यथा नव्हे ॥ २५ ॥
ऐसी हे नवविधा भक्ती । केल्यां पाविजे सायोज्यमुक्ती ।
सायोज्यमुक्तीस कल्पांतीं । चळण नाहीं ॥ २६ ॥
तिहीं मुक्तींस आहे चळण । सायोज्यमुक्ती अचळ जाण ।
त्रैलोक्यास होतां निर्वाण । सायोज्यमुक्ती चळेना ॥ २७ ॥
आवघीया चत्वार मुक्ती । वेदशास्त्रें बोलती ।
तयांमध्यें तीन नासती । चौथी ते अविनाश ॥ २८ ॥
पहिली मुक्ती ते स्वलोकता । दुसरी ते समीपता ।
तिसरी ते स्वरूपता । चौथी सायोज्यमुक्ती ॥ २९ ॥
ऐसिया चत्वार मुक्ती । भगवद्भजनें प्राणी पावती ।
हेंचि निरूपण प्रांजळ श्रोतीं । सावध पुढें परिसावें ॥ ३० ॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे आत्मनिवेदनभक्तिनाम
समास नववा ॥ ९ ॥ ४.९

समास दहावा : मुक्तिचतुष्टय
॥ श्रीराम ॥
मुळीं ब्रह्म निराकार । तेथें स्फूर्तिरूप अहंकार ।
तो पंचभूतांचा विचार । ज्ञानदशकीं बोलिला ॥ १ ॥
तो अहंकार वायोरूप । तयावरी तेजाचें स्वरूप ।
तया तेजाच्या आधारें आप । आवर्णोदक दाटलें ॥ २ ॥
तया आवर्णोदकाच्या आधारें । धरा धरिली फणिवरें ।
वरती छपन्न कोटी विस्तारें । वसुंधरा हे ॥ ३ ॥
इयेवरी परिघ सप्त सागर । मध्य मेरू माहां थोर ।
अष्ट दिग्पाळ तो परिवार । अंतरें वेष्टित राहिला ॥ ४ ॥
तो सुवर्णाचा माहा मेरू । पृथ्वीस तयाचा आधारु ।
चौर्यांसी सहस्र विस्तारु । रुंदी तयाची ॥ ५ ॥

उंच तरी मर्यादेवेगळा । भूमीमधें सहस्र सोळा ।
तया भोवता वेष्टित पाळा । लोकालोक पर्वताचा ॥ ६॥
तया ऐलिकडे हिमाचळ । जेथें पांडव गळाले सकळ ।
धर्म आणी तमाळनीळ । पुढें गेले ॥ ७॥
जेथें जावया मार्ग नाहीं । मार्गी पसरले माहा अही ।
सितसुखें सुखावले ते ही । पर्वतरूप भासती ॥ ८॥
तया ऐलिकडे सेवटीं जाण । बद्रिकाश्रम बद्रिनारायण ।
तेथें माहां तापसी, निर्वाण- । देहत्यागार्थ जाती ॥ ९॥
तया ऐलिकडे बद्रिकेदार । पाहोन येती लहानथोर ।
ऐसा हा अवघा विस्तार । मेरुपर्वताचा ॥ १०॥
तया मेरुपर्वतापाठारीं । तीन शृंगे विषमहारी ।
परिवारें राहिले तयावरी । ब्रह्मा विष्णु महेश ॥ ११॥
ब्रह्मशृंग तो पर्वताचा । विष्णुशृंग तो मर्गजाचा ।
शिवशृंग तो स्फटिकाचा । कैळास नाम त्याचें ॥ १२॥
वैकुंठ नाम विष्णुशृंगाचें । सत्यलोक नाम
ब्रह्मशृंगाचें ।
अमरावती इंद्राचें । स्थळ खालतें ॥ १३॥
तेथें गण गंधर्व लोकपाळ । तेतिस कोटी देव सकळ ।
चौदा लोक, सुवर्णाचळ- । वेष्टित राहिले ॥ १४॥
तेथें कामधेनूचीं खिलारें । कल्पतरूचीं बनें अपारें ।
अमृताचीं सरोवरें । ठाई ठाई उचंबळतीं ॥ १५॥
तेथें उदंड चिंतामणी । हिरे परिसांचियां खाणी ।
तेथें सुवर्णमये धरणी । लखलखायमान ॥ १६॥
परम रमणीये फांकती किळा । नव्वरत्नाचिया पाषाणसिळा ।
तेथें अखंड हरुषवेळा । आनंदमये ॥ १७॥
तेथें अमृतांचीं भोजनें । दिव्य गंधें दिव्य सुमनें ।
अष्ट नायका गंधर्वगायनें । निरंतर ॥ १८॥
तेथें तारुण्य वोसरेना । रोगव्याधीहि असेना ।
वृधाप्य आणी मरण येना । कदाकाळीं ॥ १९॥
तेथें येकाहूनि येक सुंदर । तेथें येकाहूनि येक चतुर ।
धीर उदार आणी शूर । मर्यादेवेगळे ॥ २०॥
तेथें दिव्यदेह ज्योतिरूपें । विद्युल्यतेसारिखीं स्वरूपें ।
तेथें येश कीर्ति प्रतापें । सिमा सांडिली ॥ २१॥
ऐसें तें स्वर्गभुवन । सकळ देवांचें वस्तें स्थान ।
तयां स्थळाचें महिमान । बोलिजे तितुकें थोडें ॥ २२॥
येथें ज्या देवाचें भजन करावें । तेथें ते देवलोकीं
राहावें ।
स्वलोकता मुक्तीचें जाणावें । लक्षण ऐसें ॥ २३॥
लोकीं राहावें ते स्वलोकता । समीप असावें ते समीपता ।
स्वरूपचि व्हावें ते स्वरूपता- । तिसरी मुक्ती ॥ २४॥
देवस्वरूप जाला देही । श्रीवत्स कौस्तुभ लक्ष्मी नाहीं ।
स्वरूपतेचें लक्षण पाहीं । ऐसें असे ॥ २५॥
सुकृत आहे तों भोगिती । सुकृत सरतांच ढकलून देती ।
आपण देव ते असती । जैसे तैसे ॥ २६॥
म्हणौनि तिनी मुक्ति नासिवंत । सायोज्यमुक्ती ते शाश्वत ।
तेहि निरोपिजेल सावचित्त । ऐक आतां ॥ २७॥
ब्रह्मांड नासेल कल्पांतीं । पर्वतासहित जळेल क्षिती ।
तेव्हां अवघेच देव जाती । मां मुक्ति कैंच्या तेथें ॥ २८॥
तेव्हां निर्गुण परमात्मा निश्चळ । निर्गुण भक्ती तेहि अचळ ।
सायोज्यमुक्ती ते केवळ । जाणिजे ऐसी ॥ २९॥
निर्गुणीं अनन्य असतां । तेणें होये सायोज्यता ।
सायोज्यता म्हणिजे स्वरूपता- । निर्गुण भक्ती ॥ ३०॥
सगुण भक्ती ते चळे । निर्गुण भक्ती ते न चळे ।
हें अवघें प्रांजळ कळे । सद्गुरु केलियां ॥ ३१॥
इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे मुक्तिचतुष्टयेनाम
समास दहावा ॥ १०॥ ४.१०
॥ दशक चौथा समाप्त ॥

NA
Proofread by Vishwas Bhide and Sunder Hattangadi.
Reproofread by P. D. Kulkarni